# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-18.05.2026** **वार- सोमवार**

---

**विधानपरिषद निवडणूक**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील द्वैवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघासाठीही निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीसाठी २५ मे रोजी अधिसूचना जारी होईल, 1 जूनपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येईल, अर्जांची छाननी २ जून रोजी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ४ जून आहे. या निवडणुकीसाठी १८ जून रोजी, सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. तर मतमोजणी २२ जून रोजी होणार आहे.

**नीटपेपरफूटी**

नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं लातूरमधील खाजगी शिकवणी वर्गाचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना आज पुण्यातून अटक केली. त्यांना दिल्लीतील राऊज अवेन्यू न्यायालयानं 9 दिवसाची सीबीआय कोठडी सुनावली आहे. पुण्यातील CBIच्या कार्यालयात काल रात्रीपासून त्यांची चौकशी सुरू होती. दरम्यान, पुणे आणि लातूरमधील RCC क्लासेस परिसरातही CBI कडून संबंधितांची चौकशी करण्यात आली आहे. या प्रकरणाशी संबंधित अन्य आरोपी शुभम खैरनार याच्या कार्यालयाचीही तपासणी करण्यात आली. पुण्यातील अन्य एक आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीतील राऊज अवेन्यू न्यायालयानं १४ दिवसांची CBI कोठडी सुनावली आहे.

**प्रताप सरनाईक**

वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव एसटी महामंडळाच्या विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ केली जाणार नाही, असं परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितलं. महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर घेतलेल्या बैठकीनंतर ते आज मुंबईत बोलत होते. डिझेल दरवाढीमुळे महामंडळावर दर महिन्याला 10 कोटी रुपयांचा, तर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार पडणार आहे. एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करत आहे, त्यामुळे भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घ्यावा लागू शकतो, असं सरनाईक म्हणाले.

**निदर्शने**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीच्या निषेधार्थ आज पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आलं. या वेळी आंदोलकांनी बैलगाडी आणि टांगा मोर्चा काढत केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

**विद्यापीठ**

विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणाऱ्या प्रवेश शुल्काबाबतची संपूर्ण माहिती महाविद्यालयाच्या दर्शनी भागात, संकेतस्थळावर तसंच माहिती पुस्तिकेत स्पष्टपणे नमूद करणं बंधनकारक करण्यात आलं आहे. नियमबाह्य किंवा बेकायदा शुल्क आकारल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिला आहे. उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळणकर यांनी विद्यार्थ्यांच्या शुल्कासंदर्भातील सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश सर्व विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक तसंच विद्यापीठांच्या कुलसचिवांना दिले आहेत.

त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानं सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना यासंदर्भात आदेश जारी केले आहेत.

**Pcmc**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये "हरित आणि आत्मनिर्भर शहर" संकल्पनेअंतर्गत विविध पर्यावरणपूरक आणि ऊर्जा बचतीचे उपक्रम राबवण्याचा निर्णय महापौर रवी लांडगे यांनी घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या ऊर्जा बचत, पर्यावरण संवर्धन आणि स्वदेशी वापराच्या संदेशाला तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांना प्रतिसाद म्हणून ही विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत "हरित पिंपरी-चिंचवड आठवडा", "नो पॉवर अवर", "एक कर्मचारी – एक वृक्ष", ई-वाहन प्रोत्साहन, "स्वदेशी बाजार" कागदविरहित प्रशासन, यासारखे उपक्रम राबवले जाणार आहेत. ऊर्जा बचत आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश हा केवळ शासनाचा कार्यक्रम नाही; लोकसहभागातून ते एक जनआंदोलन बनवण्याचा प्रयत्न असल्याचं महापौर लांडगे यांनी म्हटलं आहे.

**Pcmcआयुक्त**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व विभाग प्रमुखांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक आज आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. पिंपरी चिंचवड शहरात अनधिकृत बांधकामांना आणि अतिक्रमणांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही; शहराच्या नियोजनाला बाधा आणणाऱ्या अशा प्रकारांवर तातडीने कठोर कारवाई करावी, असे निर्देश सूर्यवंशी यांनी दिले. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाईची कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 तर किमान तापमान 24 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच राहून दुपारनंतर वातावरण ढगाळ होण्याची शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत ; उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**